# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 07/06/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील बोरडा फाटा कन्हान येथे दिनांक 06/06/2021 चे 16:30 वा. ते 17.00 वा. दरम्यान फिर्यादीचा भाउ नामे– निलेश रामदास मोहनकर (मृतक) वय 25 वर्ष, रा. काचुरवाही रामटेक हा त्याचे एमएच– 40/एएच– 2194 क्रमांकाच्या मोटरसायकलने त्याचा चुलत भाउ प्रितम प्रकाश मोहनकर, वय 16 वर्ष याचे सोबत काचुरवाही रामटेक येथे जात होता. त्यादरम्यान आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरघाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वरील एमएच– 40/एएच– 2194 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात फिर्यादीचा भाउ निलेश मोहनकर हा गंभीर जखमी होवुन मरण पावला व प्रितम प्रकाश मोहनकर हा गंभीर जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मंगेश रामदास मोहणकर, वय 27 वर्ष, रा. काचुरवाही रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री शेख मो न. 9403692766 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. रामटेक :– दि. 05/06/2021 चे 13:00 वा. ते 13.15 वा. चे सुमारास 29 वर्षीय पीडित/फिर्यादी हिला आरोपी नामे– निखील भिमराव खेब्रागडे, वय 27 वर्ष, रा. वार्ड क्र 3, नेरला हा तिच्या घराच्या खिडकीतुन रात्री लपुन पाहतो. तसेच ''तुमचा व्हिडीओ माझे मोबाईलमध्ये असुन तुम्ही मला जर भेटायला आले नाही तर तो व्हिडीओ मी तुमच्या नवऱ्याला व गावातील लोंकाना दाखवुन बदनामी करेल'' अशी धमकी देत आरोपीने पीडितेला शरीर सुखाची मागनी करून पीडितेचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ड), 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि मिना बारंगे या करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 17 कि.मी अंतरावर मौजा सिरसोंली येथे दि. 05/06/2021 चे 15.00 वा. ते 16.00 वा. चे फिर्यादीचा भाउ नामे– महेश देशमुख हा त्याची एम. एच– 40/ए.वाय.– 4106 क्रमांकाची बजाज कंपनीची सी. टी. 100 मोटरसायकलने शेतात काम करण्याकरीता गेला. तो मोटरसायकल शेतात ठेवून खात येथे कामाने गेला होता. यानंतर तो शेतात परत आला असता, तेव्हा त्याला त्याची मोटरसायकल दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने त्याची मोटरसायकल कि. 10,000/–रू. ची चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गौरीशंकर गोपाल देशमुख वय 25 वर्ष रा. सिरसोली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.ना. राजेंद्र पुडके मो. न. 9823311162 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर